स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत 'राज्यशास्त्र' विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचाआराखडा

* संशोधन विषय *

" महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा तुलनात्मक अभ्यास, विशेष संदर्भ : नांदेड आणि निर्मल जिल्हा "
(2014 ते 2022)

* संशोधक *

अवधुतवाड धनराज अंतेश्वर

मु. पो. किनी ता. भोकर जि. नांदेड

* संशोधन मार्गदर्शक *

प्रा. डॉ. डोंगरे एल. बी.

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर जि. नांदेड

* संशोधनकेंद्र *

पीपल्स महाविद्यालय, नांदेड

मार्च 2022

“ महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा तुलनात्मक अभ्यास, विशेष संदर्भ : नांदेड आणि निर्मल जिल्हा ” (2014 ते 2022)

प्रस्तावना (Introduction)

भारतात प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थेचे अस्तित्व दिसून येते. मात्र, ही संस्था जात व परंपरागत वारसा या संकुचित आधारस्तंभावर आधारलेली होती. केवळ कर गोळा करणे आणि मालमत्तेचे व जीविताचे सरंक्षण करण्यापुरते तिचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. लोकांना जबाबदार असलेल्या, निर्वाचित प्रातिनिधिक शासन असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा उदय सर्वप्रथम युरोपीय देशात झाला. भारतात ही पद्धत ब्रिटिशांनी रुजवली. भारतातील आधुनिक स्थानिक स्वराज्य संस्थेचे जनक ‘लॉर्ड रिपन’ यांना मानले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास फार प्राचीन आहे. त्यामुळे या संस्थेला वेगवेगळ्या कालखंडामध्ये भिन्न-भिन्न नावाने ओळखले जात असले तरी या संस्थेचा उद्देश ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी राहिली आहे. भारताने लोकशाही शासन पद्धती स्वीकारल्यामुळे केंद्र पातळीवर संसद तर राज्य पातळीवर विधिमंडळ गृहाची स्थापना केली. परंतु भारतामध्ये 70 ते 75 टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहत असल्यामुळे त्यांचे प्रश्न सोडविणे आणि सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेवर टाकण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

प्राचीन काळापासून भारतात पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात असल्याचे आढळून येते. आदिम काळापासून गावातील ज्येष्ठ व वयोवृद्ध व्यक्ती ‘गावप्रमुख’ म्हणून प्रतिनिधित्व करत असल्याने इतिहासाच्या अध्ययनावरून लक्षात येते. प्राचीन काळी छोटी छोटी राज्ये होती. त्यांना   ‘जनपद’ संबोधले जाई. खेडेगाव हा राज्याचा लहान भाग मानला जात असे. त्याच्या प्रमुखास ‘ग्रामप्रमुख’ म्हटले जात होते. ऋग्वेद काळात ज्या ग्रामसभा होत असत त्यातील ग्रामसभेच्या प्रमुखास ‘ग्रामिणी’ म्हटले जात असत. रामायण महाभारत काळात ग्रामीण प्रशासनाचा उल्लेख स्पष्टपणे आढळतो. यामध्ये ‘सभा व समित्यांचा’ उल्लेख आढळतो. वाल्मिकी रामायणामध्ये ‘जनपद’ अस्तित्वात होते. महाभारत

काळात सुद्धा जवळपास वैदिक काळातील ग्रामपंचायतीसारखे स्वरूप होते. या बाबतचे वर्णन 'शांतीपर्व व सभा पर्वतातील' अध्यायामध्ये पहावयास मिळते.

बौद्ध काळातील जातक कथांमध्ये पंचायत तंत्राबाबत वर्णन आढळते. बौद्धकाळात ग्रामसभेच्या प्रमुखास 'ग्रामभोजक' म्हटले जात असे. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रात' स्थानिक स्वराज्य संस्थेचा उल्लेख आढळतो. प्रशासकीय व्यवस्थेकरिता कौटिल्याने राष्ट्राचे नागरी प्रशासन व ग्रामीण प्रशासन असे विभाजन केले होते. मौर्य काळात ग्रामीण शासन संस्था अतिशय प्रगत होत्या. त्या काळात ग्रामीण प्रशासन पूर्णतः शेतीशी संबधित असे. मौर्यांनी स्वायत्त शासन प्रणाली प्रचलित करून शासनाचे विकेंद्रीकरण करण्याची नीति अवलंबली होती. मध्ययुगीन काळात ग्रामप्रमुख, ग्रामसभा आणि खेड्यातील इतर अधिकारी स्थानिक पातळीवर कार्यरत असल्याचे आढळते. चौदाव्या शतकातील मुघलांच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेचे अस्तित्व असून गाव प्रमुखास 'मुकदम किंवा मुखिमा' तर हिशेबनिसास 'पटवारी' असे संबोधले जात होते.

प्राचीन काळातील 'पंचायत', स्वातंत्र्यपूर्व काळातील महात्मा गांधी यांचे, 'ग्रामस्वराज्य' किंवा 'रामराज्य' व भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक म्हणून ओळखले जाणारे, लॉर्ड रिपन यांची स्थानिक शासनाविषयीचे धोरण आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने स्वीकारलेले त्रिस्तरीय शासनव्यवस्था म्हणजेच 'पंचायतराज' संकल्पनेचा, प्रामुख्याने ग्रामीण भागालाच विशेष महत्त्वाचे स्थान दिल्याचे दिसून येते. शिवाय, कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशाने राबविलेले शासणनिर्णय, धोरणे, योजना, उपक्रम इत्यादींचा यशस्वी अंमलबजावणी कितपत झाली हे त्या देशातील ग्रामीण भागातून समजून येते.

भारत देश, ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतर स्वतंत्र भारताची, पंडीत नेहरू यांच्याकडे पंतप्रधान, पदाची जबाबदारी आली. पंडीत नेहरू यांनी लोकशाही प्रणाली अधिक सुदृढ, सक्षम, क्रियाशील आणि विकसित करण्याच्या उद्देशाने कल्याणकारी शासनव्यवस्थेचा स्वीकार केला. याचीच फलश्रुती म्हणजेच बलवंतराय मेहता समितीच्या, शिफारसीनुसार पंचायतीराज व्यवस्थेचा स्विकार करणारे राजस्थान हे पहिले राज्य ठरले. 2 ऑक्टोबर, 1959 रोजी नागौर जिल्ह्यात, तत्कालीन पंतप्रधान पंडीत नेहरू यांनी या योजनेची सुरुवात केली. राजस्थाननंतर आंध्रप्रदेशने 1959 मध्येच ही पद्धत स्वीकारली. बहुतेक राज्यांनी पंचायतीराज संस्था स्थापन केल्या तरी स्तरांची संख्या, समिती आणि परिषद यांचे तौलनिक स्थान, त्यांचा कार्यकाल, संरचना, कार्ये, वित्तव्यवस्था इत्यादी बाबतीत राज्या-

राज्यात फरक होते. महाराष्ट्रात लोकशाही विकेंद्रीकरण संकल्पना राबविण्यासाठी वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली 1960 मध्ये समिती स्थापन करण्यात आली. आणि, त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेचा स्विकार करण्यात आला. महराष्ट्राच्या शेजारी असलेल्या आंध्रप्रदेश या राज्यातून 2 जून 2014 रोजी निर्मिती करण्यात आलेल्या तेलंगाणा राज्यात पंचायतराज व्यवस्थेत मंडळ या स्तराला विशेष महत्त्व दिले गेले.

मे, 2018 मध्ये नांदेड जिल्ह्यातील तेलंगाणा या राज्याच्या सीमेलगत असलेले, नांदेड जिल्ह्यातील काही गावांच्या नागरिकांनी तसेच धर्माबाद तालुक्यातील सरपंच संघटनेच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्र्याकडे तेलंगाणा राज्यात समावेश करण्यासंबधी मागणीचे निवेदन देण्यात आले होते. ही मागणी म्हणजे शेजारील राज्यात ग्रामीण भागात होत असलेले विविध विकासकामे, विविध योजनांची अंमलबजावणी व त्यांची सकारात्मक भूमिका यामुळे तेलंगाणा राज्याचे विकासाचे प्रारूप महाराष्ट्रातील जनतेला आवडल्याचे दिसून येते. विशेषत: तेलंगाणा राज्यातील शेजारच्या निर्मल जिल्ह्यातील ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून झालेला विकास हा महाराष्ट्राच्या तुलनेत अधिक सरस असल्याचे दिसून येते. म्हणून महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, आर्थिक व तांत्रिक घटकांचा तुलनात्मक अभ्यास होणे आवश्यक आहे.

संशोधन समस्या (Research Problem)

भारतासारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीने विपुल प्रमाणात सुबत्ता असलेल्या, भौगोलिक विविधतेने नटलेल्या, खंडप्राय आणि कृषिप्रधान देशात लोकशाहीच्या बळकटीसाठी संसदीय, संघराज्य लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला गेला. केंद्र व राज्य शासनाने आखलेल्या विविध कल्याणकारी, प्रशासकीय आणि विकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामीण भागातील स्थानिक समस्या सोडविण्याची जबाबदारी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना कुशलतेने पार पाडावी लागते.

नांदेड जिल्ह्यातील तेलंगाणा राज्याच्या सीमेलगत असलेल्या गावातील नागरिकांनी शेजारच्या राज्यात समावेश करण्याची मागणी केल्यानंतर असे दिसून येते की, तिथे निश्चितच ग्रामीण स्तरावर विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत असावी. तसेच शेजारील राज्यात राबविले जात असलेले विविध कल्याणकारी आणि लोकोपयोगी योजना आणि विकासकामे आणि प्रारूप यांचा

तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी संशोधक म्हणून, “महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा तुलनात्मक अभ्यास, विशेष संदर्भ: नांदेड आणि निर्मल जिल्हा” (2014 ते 2022) ही संशोधन समस्या निश्चित करून संशोधनासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

संशोधनाचे महत्त्व (Importance of Research)

भारतात बहुसंख्य लोक खेड्यात राहतात. महात्मा गांधीजींनी, “खेड्यांकडे चला” हा संदेश दिला होता. त्यामुळेच ग्रामीण भागाला प्रत्येक योजनेत महत्त्व दिले जाते. ग्रामीण भागाचा विकास हा अग्रणी घटक असतो. केंद्र सरकारपासून ते ग्रामस्तरावरील ग्रामपंचायत ही त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थांची यंत्रणा आपापल्या स्तरावर महत्वपूर्ण योगदान देत असतात. मात्र, योजनांची प्रभावी अंमलबजावणी कितपत झाली किंवा त्याची यशस्वीता ही ग्रामीण भागातूनच ठरवली जाते. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत देशाचे स्थान टिकवून ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा देखील विविध क्षेत्रात निश्चितच उपयोग करणे क्रमप्राप्त ठरते. त्यात शहरी, ग्रामीण भाग असा भेद करता येत नाही.

शेजारच्या तेलंगाणा राज्याच्या निर्मितीपासूनच तेथील टीआरएस पक्षाचे सरकार, मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वात आपल्या विविध कल्याणकारी आणि लोकोपयोगी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे लोकप्रिय होताना दिसून येत आहे. अलीकडच्या काळात ग्रामीण भागातही विकासाचे आणि बदलाचे वारे वाहताना दिसून येत आहे. ग्रामीण भागात सुद्धा अत्याधुनिक सोयीसुविधा मिळत आहेत. यात ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था सुद्धा आपल्या कार्यपद्धतीत बदल घडवून आणलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थानी ई-प्रशासन, सुशासन इत्यादी नवसंकल्पनाचा अवलंब करून खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील नागरिकांना मूलभूत सोयीसुविधांची पूर्तता करून, त्यांचे जीवन अधिक सुखकारक करण्यासाठी आणि त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

या प्रयत्नात त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था राबविणारे दोन वेगवेगळे परंतु, एकमेकांचे शेजारील राज्य असलेले, महाराष्ट्रातील जिल्हा हे नियोजनाचे व विकासाचे एकक असलेले नांदेड जिल्हा आणि तेलंगाणा राज्यातील, प्रभाग हे नियोजनाचे व विकासाचे एकक असलेले आणि मंडळ स्तरावर विशेष कार्यपद्धती अवलंब करणारे, तेलंगाणा राज्यातील निर्मल जिल्हा यांचा प्रामुख्याने तौलनिकस्थान, त्यांची

कार्यपद्धती, कार्यकाळ, संरचना, कार्ये, वित्तव्यवस्था इत्यादी बाबींचा विचार करून तुलनात्मक अभ्यासातून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था कितपत यशस्वी ठरल्या आहेत? ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासात्मक धोरणांच्या निर्मितीत स्थानिक स्वराज्य संस्थां काय योगदान देत आहेत? तसेच, शासनाने राबविलेल्या विविधयोजना जनतेपर्यंत किती आणि कसे पोहचले? यासारख्या, इतर प्रश्नांचा सदरील संशोधनातून अभ्यास करण्यात येईल. तसेच यासारखे म्हणजेच दोन राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा तुलनात्मक अभ्यास झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरील संशोधन हे विद्यार्थी, पालक, नागरिक, राजकीय कार्यकर्ते, संशोधक, अभ्यासक, प्रशासकीय यंत्रणा, शासन आणि इतर घटकांना उपयुक्त, फायदेशीर आणि महत्त्वपूर्ण असणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research)

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहेत.

1) 73 व्या घटना दुरुस्तीचा अभ्यास करणे.

2) महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा अभ्यास करणे.

3) महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्या तील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या रचना आणि कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.

4) महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील ग्रामीण भागात राबविल्या जाणाऱ्या राज्य सरकारच्या विविध शासकीय योजना, कार्यक्रम व उपक्रमांचा अभ्यास करणे.

5) शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या भूमिका आणि कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.

6) महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील ग्रामीण भागातील विकास प्रारुपाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके (Hypothesis of Research)

प्रस्तुत संशोधनाची गृहितके पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहेत.

1) 73 व्या घटनादुरुस्तीमुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम झाल्याचे दिसून येते.

2) महाराष्ट्राच्या तुलनेत तेलंगाणाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्रीय भूमिकेमुळे ग्रामीण भागातील विकास प्रक्रियेला वेग आल्याचे दिसून येते.

3) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासात्मक कार्यामुळे ग्रामस्तरावरील कामे अधिक गतिमान आणि गुणवत्तापूर्ण झाल्याचे दिसून येते.

4) ग्रामीण स्थानिक संस्था स्तरावर विविध शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागाचा विकास झाल्याचे दिसून येते.

5) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींची विकासवादी भूमिका असल्याचे दिसून येते.

6) तेलंगाणा राज्याचे विकासाचे प्रारूप महाराष्ट्राच्या तुलनेत अधिक गतिशील, विकसित असल्याचे दिसून येते.

संशोधनाची व्याप्ती / मर्यादा (Scope of Research)

संशोधन समस्येच्या संबंधीत संशोधनाला निश्चित असा आकार प्राप्त होण्यासाठी संशोधनाची व्याप्ती निश्चित करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधनकार्य हे महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्हा आणि तेलंगाणा राज्यातील निर्मल जिल्हा या दोन जिल्ह्यांशी संबधित असल्याने या दोन जिल्ह्यातील ग्रामीण स्थनिक स्वराज्य संस्थाचा, केंद्रसरकारमार्फत राबविले जाणारे आणि दोन्ही राज्यात सामाईक असणाऱ्या विविध प्रमुख योजना आणि महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यसरकारच्या विशेष प्रभावीपणे राबविलेले काही योजना आणि अन्य काही उपक्रम (2014 ते 2022) या काळातील तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थाचा इतिहास तसेच महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील विद्यमान व्यवस्था यांची दखल घेतली जाणार आहे. नांदेड आणि निर्मल जिल्हायांतील

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थावर एक दृष्टीक्षेप टाकण्यात येणार आहे. नांदेड आणि निर्मल जिल्ह्याची भौगोलिक मर्यादा ही संशोधनाची मर्यादा असणार आहे.

संशोधन पद्धती (Research Method)

महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाचा तुलनात्मक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड आणि निर्मल जिल्हा असा संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर संशोधनासाठी नांदेड आणि निर्मल जिल्ह्यांचा राजकीय, सामाजिक व आर्थिक अभ्यासाचा विषय असल्याने संशोधन निःपक्षपातीपणे व वस्तुनिष्ठ व्हावे म्हणून निरीक्षण, अवलोकन व ग्रंथालयीन अध्ययन पद्धती या साधनांचा अवलंब केला जाणार आहे.

विशिष्ट व्यक्तींच्या, समुहाच्या व स्थितीचा वैशिष्ट्यांमध्ये तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था यांचे यथा तथ्य वर्णन करणे हा वर्णनात्मक अध्ययनाचा हेतू असतो. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक सांख्यिकीय विश्लेषण व सर्वेक्षणात्मक पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे.

तथ्य संकलन (Data Collection)

संशोधनास विशिष्ट स्वरुपाचे मार्ग प्राप्त करुन देण्याचे साहित्य म्हणजे तथ्य होय. संशोधनात तथ्य महत्त्वाची भूमिका बजावतात. संशोधन समस्येशी निगडीत उचित आणि योग्य तथ्य संकलन करणे गरजेचे असते. कारण, यावरच संशोधनाची यशस्विता अवलंबून असते. सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाला विशेष महत्त्व प्राप्त होते. तथ्यांच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. संशोधनाशी संबंधित विविध घटनांचे अध्ययन करुन घटनासंबंधीच्या तथ्यांचे संकलन केले जाते.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनासाठी दोन प्रकारच्या तथ्यांचा उपयोग करण्यात येईल.

1. प्राथमिक स्रोत

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक स्रोत म्हणून मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची, निरीक्षण, अवलोकन, चर्चा व सर्वेक्षण या तंत्रांचा अवलंब करण्यात येईल. नमुनादाखल दोन्ही जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाचे अधिकारी, पदाधिकारी आणि जनतेच्या मुलाखती घेण्यात येतील.

2. दुय्यम स्रोत

द्वितीय स्रोत म्हणून विविध ग्रंथालयामध्ये उपलब्ध असणारे संदर्भग्रंथ, प्रकाशित, अप्रकाशीत शोधप्रबंध, संशोधन साहित्य, ज्ञानकोश, नियतकालिके, शासकीय अहवाल, वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, दोन्ही राज्यशासनांकडून प्रसिध्द होणारे शासकीय अहवाल, शासकीय संकेतस्थळे, इंटरनेट, विविध पत्रके, महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्य सरकारच्या शासकीय अहवाल, वार्षिकी आणि विविध शासकीय कार्यालयातून तसेच अन्य विश्वसनीय स्त्रोताकडून माहिती संकलीत करण्यात येईल.

प्रकरण आराखडा

प्रस्तुत संशोधन पुढील सहा प्रकरणांमध्ये पूर्ण केले जाईल.

1. प्रकरण पहिले - प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर स्थानिक स्वराज्य संस्था, ऐतिहासिक पार्श्वभूमी, रचना कार्यपद्धती विविध समित्या व आयोगाचा आढावा विस्तृतपणे पहिल्या प्रकरणात घेण्यात येईल.

2. प्रकरण दुसरे - संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहीतके, व्याप्ती, संशोधनपद्धती, तथ्य संकलन, पूर्व संशोधन साहित्याचा आढावा इत्यादी बाबींचा विस्ताराने परामर्श दुसऱ्या प्रकरणात घेण्यात येईल.

3. प्रकरण तिसरे - महाराष्ट्र व तेलंगाणा राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था

सदरील प्रकरणात महाराष्ट्र राज्य आणि तेलंगाणा राज्यातील पंचायतराज व्यवस्था दोन्ही राज्यातील पंचायतराज व्यवस्थेचे वेगळेपणा तसेच, नांदेड व निर्मल जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, भौगोलिक, सांस्कृतिक, इत्यादी परिस्थितीचा आढावा घेण्यात येईल.

4. प्रकरण चौथे - महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील ग्रामविकास योजना

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील दोन्ही जिल्ह्यातील राज्यसरकार मार्फत ग्रामीण स्तरावर राबविले जाणारे विविध शासकीय ध्येयधोरणे व विविध उपक्रमांचे विश्लेषण व

तुलनात्मक अभ्यास केला जाईल. तसेच त्या योजना किती प्रभावीपणे नागरिकापर्यंत पोहचलेत याचा सुद्धा परामर्श घेण्यात येईल.

5. प्रकरण पाचवे - महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे तुलनात्मक अध्ययन

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र आणि तेलंगाणा राज्यातील तसेच नांदेड व निर्मल जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेचा सामाजिक,राजकीय व आर्थिक दृष्टिकोनातून विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच स्वरूप, कार्यपद्धती धोरणे, कार्यक्रम, उपक्रम, अमंलबजावणी, शासक, प्रशासक, लोकप्रतिनिधी यांची भूमिका, ई- प्रशासन, सुशासन, लोककल्याणकारी योजना, भौतीक सुविधा इत्यादी संबंधी तथ्यांचे संकलन करुन त्याचे विश्लेषण करण्यात येईल. तसेच विविध विकासाचे घटक प्रमाण मानून त्यांचे तुलनात्मक पद्धतीने विश्लेषण करण्यात येईल.

6. प्रकरण सहावे - निष्कर्ष व शिफारशी

या शेवटच्या प्रकरणात संशोधनाचे निष्कर्ष काढून काही महत्त्वाच्या शिफारशी करण्यात येतील. या शोध प्रबंधात विविध अंगाने अभ्यास केल्यानंतर या समस्येच्या अभ्यासाअंती संशोधनातून काढण्यात येणारे निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात मांडले जाणर आहेत. तसेच शोधप्रबंधाचा सारांश मांडला जाईल.

थोडक्यात, संशोधन विषयाच्या अभ्यासातील गृहीतकांची सप्रमाणता, निष्कर्ष व शिफारशी यासंदर्भात विश्लेषण करण्यात येईल.

संदर्भसूची (References)

1. सबलोक संदीप – पंचायत राज मे ग्रामीण विकास, अमन प्रकाशन, सागर मध्यप्रदेश.
2. सिंह उमेश प्रसाद – पंचायत राज व्यवस्था मे पंचायत समिती, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली.
3. डॉ. शर्मा श्रीनाथ, डॉ. सिंह मनोजकुमार (सम्पा) - पंचायतराज एवं ग्रामीण विकास, अर्जुन पब्लिकेशन, दिल्ली.

4. डॉ. शर्मा के.के. - भारत मे पंचायतीराज, कॉलेज बुक डेपो, जयपूर.
5. वाधवा शालीनी - भारतीय स्थानीय स्थानिक प्रशासन, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.
6. एम. लक्ष्मिकांत- इंडियन पोलिटी, के सागर पब्लिकेशन, पुणे
7. गौर पी.पी. – लोकतांत्रिक विकेंद्रीकरण और ग्रामीण विकास, नई दिल्ली.
8. डॉ. अर्जुनराव दर्शनकार - पंचायतराज व नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.
9. प्रा. यलमवाड गोविंद - स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन, नांदेड.
10. डॉ. पुखराज जैन व डॉ. बि.एल. फडीया – भारतीय शासन एवं राजनीती, साहित्य भवन पब्लिकेशन, नई दिल्ली.
11. कटार सिंह, अनिल शिशोदिया - ग्रामीण विकास – सेज पब्लिकेशन प्रायव्हेट लिमिटेड.
12. डॉ. भोळे भा.ल. - भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे आणि कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
13. आगलावे प्रदीप - सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
14. एबेळीकर रमेश - भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, विद्या बुक्स, औरंगाबाद.
15. गायकवाड टी. एन. - महाराष्ट्रातील स्थानिक शासन, स्वप्नाली प्रकाशन, अहमदपूर.
16. पाटील वा.भा. - पंचायत राज, प्रशांत पब्लीकेशन,जळगाव.
17. पाटील वा.भा. - संशोधन पद्धती , प्रशांत पब्लीकेशन,जळगाव.
18. प्रा. एरंडे वि. एल. – भारतीय लोकशाही अपेक्षा आणि वास्तव, निर्मल प्रकाशन, नांदेड.
19. डॉ. विभूते भालबा – पंचायतीराज व्यवस्था. मनोविकास प्रकाशन, मुंबई.
20. EerlaRamesh – Telangana Regional Geography, Genious publication.
21. Muppidi Himadeep – Politics In Emotion, Routledge.
22. B. Raju – Local Self Government, Alahabad law agency.

23. Handbook for Sarpanch and Grampanchayat Functionaries.

24. S. Raju – Telangana movement and state formation (1948-2014)

25. D. N. Jean Chaudhari – Rural Development in India, The Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samiti Act 1961.

वर्तमानपत्रे

1. लोकसत्ता, महाराष्ट्रटाईम्स् ,लोकमत, सकाळ, पुढारी (मराठी भाषेतील वृत्तपत्रे)
2. Telangana Today, Namaste Telangana, Deccon Chronicle, Times of India , The Hindu, Daily Hindi Milap. (English and Hindi language Newspapers

संकेतस्थळे

www.maharashtra.gov.in

www.telangana.gov.in

www.wikipedia.org

www.zpnanded.in

www.nirmal.telangana.gov.in

संशोधकाचे नाव

श्री. अवधुतवाड डी. ए.
(एम. ए. बीएड, सेट.)

मार्गदर्शकाचे नाव

डॉ. डोंगरे एल. बी.
सहयोगी प्राध्यापक,
संशोधक मार्गदर्शक व
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर
ता. हिमायतनगर, जिल्हा – नांदेड